<u>अतारांकित प्रश्नोत्तरांची पहिली यादी</u>

# महाराष्ट्र विधानपरिषद

## पाचवे (हिवाळी) अधिवेशन, २०१६

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

**आयएपीएस या संस्थेला राष्ट्रीय बालस्वास्थ्य कार्यक्रमात सहभागी करण्याबाबत**

**(१) ५६८९ (०९-०४-२०१५). डॉ.सुधीर तांबे, श्री.संजय दत्त, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील निम्म्या जिल्ह्यांमध्ये बालरोग शल्यविशारद नसल्यामुळे बऱ्याच बालकांचा मृत्यू होतो, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या मुलांवर वेळेत व घराजवळ उपचार होण्यासाठी राष्ट्रीय बालस्वास्थ्य कार्यक्रमात इंडियन असोसिएशन ऑफ पेडियाट्रिक सर्जन (आयएपीएस) या संस्थेचे सुमारे पन्नास तज्ञ डॉक्टर जिल्हा रुग्णालयात लहान मुलांवर शस्त्रक्रियेसाठी जाण्यास तयार होते. परंतु त्यावर शासनाने निर्णय घेतला नसल्याचे दिनांक २१ ऑगस्ट, २०१४ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, आयएपीएस या संस्थेला राष्ट्रीय बालस्वास्थ्य कार्यक्रमात सहभागी करुन घेण्यासंदर्भात शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (०२-०८-२०१६) :** (१) हे खरे नाही. बालकांवरील शस्त्रक्रिया राष्ट्रीय बालस्वास्थ्य कार्यक्रमांतर्गत, राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजनेअंतर्गत मेडिकल कॉलेज व काही खाजगी रुग्णालयांमध्ये करण्यात येत आहेत.

(२) राष्ट्रीय बालस्वास्थ्य कार्यक्रमांतर्गत इंडियन असोसिएशन ऑफ पेडियाट्रिक सर्जन (आयएपीएस) यांना सहभागी करुन घेण्याचा निर्णय घेतला आहे. त्या अनुषंगाने अतिरिक्त संचालक (कु.क.), आरोग्य सेवा यांच्याकडून दिनांक १७ डिसेंबर, २०१५ च्या पत्रान्वये राष्ट्रीय बालस्वास्थ्य कार्यक्रमांतर्गत शस्त्रक्रिया करण्यासाठी बालरोग शल्य चिकित्सकांच्या सेवा उपलब्ध करुन घेण्याबाबतच्या मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात आलेल्या आहेत.
(३) सद्यस्थितीत २३ जिल्ह्यांतील ११०७ शस्त्रक्रियांपैकी ७२९ शस्त्रक्रिया पूर्ण करण्यात आल्या असून उर्वरित शस्त्रक्रियाबाबत पाठपुरावा करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजे झर्ये, धनगरवाडी (ता.राजापूर, जि.रत्नागिरी) येथील**
**पाझर तलावाचे काम प्रलंबित असल्याबाबत**

**(२) ६६५२ (०९-०४-२०१५). श्री.धनंजय मुंडे :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे झर्ये, धनगरवाडी (ता.राजापूर, जि.रत्नागिरी) येथील पाझर तलावाचे काम गेल्या दहा वर्षापासून प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, माहे ऑक्टोबर, २००२ मध्ये तांत्रिक मान्यता, माहे मार्च, २००६ मध्ये प्रशासकीय मान्यता मिळूनही कामाची सुरुवात माहे डिसेंबर, २००९ मध्ये झाली, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, माहे डिसेंबर, २००९ मध्ये या तलावाचे काम सुरु होऊन पूर्ण झालेले नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, तलावाचे काम अपूर्ण अवस्थेत असल्यामुळे गावक-यांना वहीवाटीमध्ये व येण्याजाण्याच्या रस्त्यामध्ये अडथळे निर्माण झाले आहेत, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, दिनांक २८ जानेवारी, २०१४ रोजी वा त्यासुमारास शासनाने या प्रस्तावाविषयी माहिती तातडीने सादर करण्याविषयी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, रत्नागिरी यांना सूचित केले आहे, हे ही खरे आहे काय,
(६) असल्यास, सदर माहिती शासनाकडे सादर न होण्याविषयी चौकशी केली आहे काय,
(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राम शिंदे (११-०५-२०१५) :** (१), (२) व (३) होय, हे खरे आहे.
(४) अंशत: खरे आहे.
(५) व (६) होय हे खरे आहे.
यासंदर्भात मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, रत्नागिरी यांचेकडे पाठपुरावा करण्यात येत आहे.
(७) प्रश्न उद्भवत नाही.

---

## महाराष्ट्र सदन व अन्य बांधकामात झालेल्या आर्थिक गैरव्यवहाराबाबत

**(३) ८०९७ (०६-०८-२०१५). डॉ.अपूर्व हिरे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र सदनाबरोबरच अन्य कामात कंत्राटदाराकडून लाच घेतल्याच्या आरोपांची अंमलबजावणी संचालनालय (ईडी) व लाचलुचपत प्रतिबंधक विभाग (एसीबी) यांच्या प्रमुख्यांच्या नेतृत्वाखालील विशेष तपास पथकामार्फत (एस.आय.टी.) सुरू असलेली चौकशी पुर्ण झाली आहे काय,

(२) असल्यास, विशेष तपास पथकाने दोन महिन्यात चौकशी पुर्ण करुन चौकशीचा अंतिम अहवाल दिनांक १५ जुन, २०१५ पर्यंत न्यायालयात सादर करावा, असा आदेश मा.मुंबई उच्च न्यायालयाने याप्रकरणी दिला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, समितीने सदरचा अंतिम अहवाल चौकशी पुर्ण करुन मुदतीत मा.न्यायालयात सादर केला आहे काय, उक्त चौकशीची सद्यःस्थिती काय आहे,

(४) असल्यास, आरोपाप्रकरणीच्या चौकशीत पुरेसे तथ्य आढळल्यास संबंधितांविरोधात गुन्हा दाखल करावा, त्यासाठी न्यायालयाच्या आदेशाची गरज नाही, असेही निर्देश मा.मुंबई उच्च न्यायालयाने दिनांक २९ एप्रिल, २०१४ रोजी वा त्यासुमारास दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, एसीबी व ईडीने केलेल्या प्राथमिक चौकशीत आरोपात तथ्य आढळून आल्याचे निदर्शनास आले असल्याने त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२९-०७-२०१६) :** (१) या प्रकरणी उघड चौकशी क्रमांक २३/१४ मधील ३ मुद्यांची चौकशी पूर्ण झाली असून उर्वरित मुद्यांची चौकशी सुरु आहे.

(२) हे खरे नाही.

(३) उघड चौकशी क्रमांक २३/१४ मध्ये ३ मुद्यांबाबत चौकशी पूर्ण झाली असून त्यानुसार ॲन्टी करप्शन ब्युरो, मुंबई येथे दाखल गु.र.क्र.३२/१५ या गुन्हयाचा तपास पूर्ण झाला असून मा.उच्च न्यायालयात दोषारोपपत्र सादर करण्याची प्रक्रिया सुरु आहे. गु.र.क्र.३५/१५ मध्ये मा.विशेष न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले असून त्याचा विशेष खटला क्रमांक १०/१६ आहे. तसेच गु.र.क्र.६९/२०१५ मध्ये मा.प्रथम वर्ग न्याय दंडाधिकारी, पनवेल न्यायालय क्रमांक १ येथे दोषारोपपत्र सादर करण्यात आले असून त्याचा विशेष खटला क्रमांक १७६/२०१६ आहे.

(४) होय.

(५) व (६) प्रस्तुत प्रकरणी एकूण ३ गुन्हे दाखल करण्यात आले असून त्यापैकी २ गुन्हयामध्ये न्यायालयात दोषारोपपत्र सादर करण्यात आले आहेत.

---

**सन २०१४-१५ या शैक्षणिक वर्षातील बहुतांश शाळांना वेतनेवर अनुदान मिळाले नसल्याबाबत**

**(४) ८१९१ (०४-०८-२०१५). श्री.दत्तात्रय सावंत :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शालेय शिक्षण विभागाच्या दिनांक २९ जानेवारी, २०१४ च्या शासन निर्णयातील परिच्छेद २ प्रमाणे भौतिक सुविधा व इतर बाबींची पूर्तता केलेल्या शाळांनाच वेतनेतर अनुदान वितरीत करण्याचे आदेश झाले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन २०१४-१५ या शैक्षणिक वर्षातील बहुतांश शाळांना वेतनेतर अनुदान मिळाले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ज्या शाळांतील भौतिक सुविधा व इतर बाबींची पूर्तता दिनांक ३१ मार्च, २०१३ पूर्वी करुन सुध्दा संबंधित शिक्षणाधिकाऱ्यांच्या दप्तर दिरंगाईमुळे प्रमाणपत्र प्राप्त न झालेल्या शाळांच्या वेतनेतर अनुदानाबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (०७-०९-२०१६) :** (१) होय.

(२) निकष पूर्ण करणाऱ्या शाळांना वेतनेतर अनुदान वितरीत करण्यात आलेले आहे.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**नागपूर जिल्ह्यात खरीप हंगामासाठी ५ लाख १३ हजार हेक्टर क्षेत्राचे नियोजन करण्याबाबत**

**(५) ९०७० (३१-०७-२०१५). डॉ.सुधीर तांबे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.संजय दत्त, श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **कृषि मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात मागील तीन वर्षापासून नापिकी, दुष्काळी परिस्थिती आणि अवकाळी पाऊस अशा नैसर्गिक संकटामुळे खचलेला शेतकरी नव्या खरीप हंगामाच्या तोंडावर आर्थिक अडचणीत असल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बियाणांची टंचाई जाणवू नये म्हणून नागपूर जिल्ह्यात खरीप हंगामासाठी ५ लाख १३ हजार हेक्टर क्षेत्राचे नियोजन करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. पांडुरंग फुंडकर (३१-०८-२०१५) :** (१) अंशतः खरे आहे.

(२) नागपूर जिल्ह्यात खरीप हंगाम २०१५ साठी ५,१३,७०० हेक्टर क्षेत्राचे नियोजन करण्यात आलेले होते. यामध्ये प्रामुख्याने भात, कापूस, सोयाबीन व तुर या प्रमुख पिकांचा समावेश होता. सदरहू क्षेत्राकरीता लागणारे ७८,७१८ क्विंटल बियाणे उपलब्ध करुन देण्यात आलेले होते. खरीप हंगाम २०१५ मध्ये बियाणांचा तुटवडा निर्माण झाला नव्हता.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठातर्फे एमकेसीएल सोबत**
**E सुविधा करिता करार करण्यात आल्याबाबत**

**(६) ११०४७ (२२-१२-२०१५). प्रा.अनिल सोले, श्री.नागो गाणार, श्री.मितेश भांगडिया :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ तर्फे एमकेसीएल सोबत E सुविधा करिता करार करण्यात आला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याकरिता विद्यार्थ्यांना ऑनलाईन रजिस्ट्रेशन आवश्यक आहे काय,

(३) असल्यास, अंतिम तारीख १० सप्टेंबर होती त्यानुसार किर्ती विद्यार्थ्यांचे ऑनलाईन रजिस्ट्रेशन झाले,

(४) सदर दिवशी वेबसाईट हँग झाल्यामुळे विद्यार्थी रजिस्ट्रेशन करु शकले नाही, हे ही खरे काय,

(५) ज्या विद्यार्थ्यांचे वेबसाईट हँग झाल्यामुळे रजिस्ट्रेशन होवू शकले नाही त्यांचेकरीता काय उपाययोजना केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. विनोद तावडे (२७-०१-२०१६) :** (१) होय.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठातर्फे एमकेसीएल सोबत E सुविधा करीता २००७ मध्ये करार करण्यात आला.

(२) होय.

(३) दिनांक १० सप्टेंबर, २०१५ रोजी पर्यंत एकूण ५४,५३७ विद्यार्थ्यांचे ऑनलाईन रजिस्ट्रेशन करण्यात आले.

(४) नाही.

(५) सदर वेबसाईट हँग झाली नसल्यामुळे व एमकेसीएल सोबत झालेल्या करारनाम्यानुसार महाविद्यालयामार्फत विद्यार्थ्यांना ऑनलाईन रजिस्ट्रेशन करावयाचे असून याकरिता वेळोवेळी विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान न होण्याकरिता सदर ऑनलाईन रजिस्ट्रेशनची तारीख वाढविण्यात आली. तसेच जे विद्यार्थी ऑनलाईन पध्दतीने रजिस्ट्रेशन करुन शकले नाही अशा विद्यार्थ्यांचे मॅन्युअल पध्दतीने परीक्षेच्या अगोदर परीक्षेसंबंधी सर्व आवश्यक ती कार्यवाही करुन त्यांना परीक्षेला बसविण्याची व त्यांचे शैक्षणिक नुकसान टाळण्याची पूर्ण खबरदारी विद्यापीठाने घेतली आहे.

---

**मे.नेपच्युन डेव्हलपर्स यांच्या प्रकल्पामधील रस्ते आरक्षण व सुविधा क्षेत्र हस्तांतरीत करुन घेण्याचे प्रस्तावाबाबत**

**(७) ११९३५ (२३-१२-२०१५). ॲड.अनिल परब :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या अखत्यारितील मौजे आंबिवली येथील मे.नेपच्युन डेव्हलपर्स यांच्या प्रकल्पामधील रस्ते आरक्षण व सुविधा क्षेत्र महापालिकेस हस्तांतरीत केलेले नसतांनाही विकासकास महानगरपालिकेने रेखांकन मंजूरी ३२०-१५३ दिनांक २८ जुलै, २०१० अन्वये मंजूरी देण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, एकूण भूखंडाचे एकत्रित क्षेत्र/बांधकाम मंजूरीचे क्षेत्र ७४९८०.८८ चौ.मी.क्षेत्राचे बांधकामास परवानगी देण्यात आली असून या इमारतींना अद्यापी पूर्णतेचा दाखला प्रदान करण्यात आलेला नसल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, आयुक्त यांनी दिनांक १२ एप्रिल, २०१२ रोजी वा त्यासुमारास झालेल्या बैठकीत विकासकास सुविधा क्षेत्र व विकास योजनेतील रस्त्याची जागा महापालिकेस हस्तांतरित करणेबाबत विकासकास यांनी जाक्र. कडोंमपा/नरवि/२२ दिनांक २४ एप्रिल, २०१२ कळविण्यात आलेले असतानाही अद्यापी सुविधाक्षेत्र व आरक्षणाची जागा विकासकाने महापालिकेस हस्तांतरीत केलेली नाही तसेच विकास योजनेतील रस्त्यांची जागा देखील हस्तांतरीत करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी महानगरपालिकेकडे दिनांक १९ जानेवारी, २०१५ व दिनांक ३ फेब्रुवारी, २०१५ रोजी विकासकाने रेखांकनातील विकास योजना आरक्षणे व सुविधा क्षेत्राचा स्थान बदलाचा प्रस्ताव सादर केला असता सदर प्रस्ताव अद्याप महानगरपालिकेने मान्य केलेला नाही, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, महानगरपालिकेकडे सुविधा क्षेत्र व आरक्षणाखालील क्षेत्र हस्तांतरीत करुन घेण्याचे प्रस्तावित असतांना विकासकास रेखांकन मंजूरी कोणत्या निकषाखाली देण्यात आली आहे,

(६) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, तद्नुसार दोषी विकासकावर महानगरपालिकेकडून तसेच शासनाकडून कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(७) तसेच सदर नियमबाह्य बांधकाम निष्कासित करण्याबाबत शासनस्तरावर काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(८) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१०-०८-२०१६) :** (१) मौजे आंबिवली येथे श्री.विष्णू पांडू भोईर व इतर यांचे कु.मु.प.धा.श्री.सचिन देशमुख (मे.नेपच्युन डेव्हलपर्स लि.) यांचे नावे दिनांक २८/७/२०१० रोजी रेखांकन मंजूरीप्रदान करण्यात आलेली आहे. या आदेशात विकासकाने सुविधा क्षेत्र, विकास योजना रस्ते व आरक्षणे महापालिकेस हस्तांतरीत करणेबाबत अट अंतर्भुत आहे. तसेच विकासकाने विकास योजना रस्त्याखालील क्षेत्र महापालिकेस हस्तांतरीत करणेसाठी दुय्यम निबंधक यांचेकडे नोंदणीकृत केलेले बंधपत्र महापालिकेस सादर केलेले आहे.

(२) प्रस्तावाखालील भुखंडावर कल्याण-डोंबिवली महापालिकेने दिनांक २८/७/२०१० रोजी रेखांकन मंजूरी व तद्नंतर दिनांक ८/८/२०१४ पर्यंत वेळोवेळी रेखांकन मंजूरीमधील इमारतींना बांधकाम मंजूरी प्रदान केल्या आहेत. प्रस्तावातील भुखंडाचे एकूण क्षेत्र ११२०२९.०० चौ.मी. आहे. विकासकाने अद्यापपर्यंत बांधकाम पुर्णतेच्या दाखल्यासाठी प्रस्ताव सादर केलेला नसल्याने बांधकाम पुर्णत्वाचा दाखला महानगरपालिकेकडून प्रदान करण्यात आलेला नाही.

(३) व (४) रेखांकनातील सुविधा क्षेत्र, विकास योजना रस्ते व आरक्षणे महापालिकेस हस्तांतरीत करणे संदर्भात आयुक्त यांचे दालनात दिनांक १२/४/२०१२ रोजी बैठक झाली असून दिनांक २४/४/२०१२ रोजीच्या पत्रांन्वये विकासकास विकास योजना रस्ते, आरक्षणे व सुविधा क्षेत्र महापालिकेस हस्तांतरीत करणेबाबत कळविण्यात आलेले आहे. विकासकाने विकास योजना रस्त्याखालील क्षेत्र महापालिकेस हस्तांतरीत करणेसाठी दुय्यम निबंधक यांचेकडे नोंदणीकृत केलेले बंधपत्र महापालिकेस सादर केलेले आहे. दिनांक १९/१/२०१५ व दिनांक ३/२/२०१५ रोजी विकासकाने रेखांकनातील विकास योजना आरक्षणे व सुविधा क्षेत्राचा स्थान बदलाचा प्रस्ताव सादर केलेला आहे. सदर प्रस्तावावर अद्याप महानगरपालिकेने अंतिम निर्णय घेतलेला नाही. बांधकाम पुर्णत्वाचा दाखल प्रदान करण्यापुर्वी सुविधा क्षेत्र व आरक्षणाखालील क्षेत्र हस्तांतरीत करुन घेण्याचे महानगरपालिकेकडून प्रस्तावित आहे.

(५) विकासकाने सादर केलेला स्थान बदलाचा प्रस्ताव महानगरपालिकेने अद्याप मान्य केलेला नसल्याने, प्रश्न उद्भवत नाही.

(६), (७) व (८) लागू नाही.

---

## देवगड (जि.सिंधुदुर्ग) तालुक्यातील रस्त्यांची झालेली दुरवस्था

**(८) ११६८० (२३-१२-२०१५). श्री.चंद्रकांत रघुवंशी, श्री.संजय दत्त :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) देवगड (जि.सिंधुदुर्ग) तालुक्यातील ५० टक्के रस्ते दुरुस्तीपलीकडे गेले असल्याचे माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त कारणास्तव ग्रामस्थांची गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१३-०७-२०१६) :** (१) अंशत: खरे आहे.

(२) दुरुस्ती आवश्यक असलेल्या रस्त्यांवरील वाहतुकीबाबत ग्रामस्थांची गैरसोय होत आहे, हे खरे आहे.

(३) सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अखत्यारीतीतील रस्त्यावरील पडलेले खड्डे डांबरमिश्रीत खडीने भरण्यात आले आहेत. जिल्हा परिषदेकडून हस्तांतरीत झालेल्या रस्त्यावरील पडलेले खड्डे डांबर मिश्रीत खडीने भरण्याबाबत कार्यवाही सुरु आहे. सन २०१५-१६ च्या योजनेतर (गट

फ) कार्यक्रमांतर्गत तालुक्यातील विविध रस्त्यावरील १३.८५ कि.मी. लांबीच्या पृष्ठभागाचे डांबरीकरण करण्याची कामे मंजूर असुन सदर कामे निविदा स्तरावर आहेत. तसेच सन २०१६-१७ च्या अर्थसंकल्पात ६.५० कि.मी. लांबीतील पृष्ठभागाची सुधारणा व डांबरीकरण करण्याची कामे मंजूर आहेत. सदर कामे पावसाळ्यानंतर हाती घेण्याचे नियोजन आहे.
(४) प्रश्न उद्‍भवत नाही.

---

**झोपडपट्टी पुनर्वसन योजनेत स्पार्क संस्थेचे जोकीन आर्पुदम व महापालिकेचे उप अभियंता यांच्या संगनमताने केलेल्या गैरव्यवहाराबाबत**

**(९) ११७१४ (२३-१२-२०१५). श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मध्य रेल्वेच्या उपनगरीय स्थानकांवर वाढणारा प्रवाशांचा ताण लक्षात घेवून रेल्वे बोर्डाने कुर्ला ते ठाणे रेल्वे स्थानकांच्या दरम्यान ५ वा व ६ वा असे दोन मार्ग टाकण्याचे ठरविण्यात आले होते, हे खरे आहे काय,
(२) या मार्गावरील झोपडपट्टीधारकांचे सर्वेक्षण करुन शासनाच्या झोपडपट्टी पुनर्वसन धोरणाप्रमाणे पात्र ठरणाऱ्या झोपडपट्टीवासीयांचे बहुमजली इमारतीतील पक्क्या व स्वयंपूर्ण सदनिकांत पुनर्वसन करण्याचे राज्य शासनाने ठरविले व या कारणाकरिता तत्कालीन नगरविकास खात्याचे प्रधान सचिव श्री.जॉनी जोसेफ यांच्या स्वाक्षरीने दिनांक २७ मार्च, १९९८ रोजी शासन निर्णय जारी करण्यात आला होता, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर शासन निर्णयाने झोपडपट्टीधारकांचे सर्वेक्षण करण्याचे काम स्पार्क या बिगर शासकीय संस्थेला देण्यात आले असून त्यानुसार शासनाच्या मालकीच्या जमिनीवर विकास नियंत्रण नियमावली ३३(१०) नुसार प्रकल्पग्रस्तांकरिता झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविण्याची जबाबदारी स्पार्क संस्थेला देण्यात आली होती, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, या प्रकरणात स्पार्क संस्थेचे (एनजीओ) जोकीन आर्पुदम व वादग्रस्त ठरलेले बृहन्मुंबई महापालिकेचे उपअभियंता श्री.विलास खर्चे या दोघांनी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या अधिकाऱ्यांशी संगनमताने दिनांक ३० सप्टेंबर, २०१० रोजी एका आशयपत्राने स्पार्क संस्थेला उप विकासक व श्री.विलास खर्चे यांना परवानाधारक सर्व्हेअर म्हणून नियुक्ती करण्यात आले, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, या योजनेद्वारे ५३,५४३ चौरस मीटर क्षेत्रफळाचा हस्तांतरणीय विकास हक्क (टीडीआर) मिळाल्याने या व्यवहारात गैरव्यवहार करुन शासनाचा सुमारे ३०० कोटी रुपयांचा महसूल बुडाला आहे, हे खरे आहे काय,
(६) असल्यास, या प्रकरणी शासनाने संबंधितांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०२-०९-२०१६) :** (१), (२) व (३) होय.

(४) सदर झोपडपट्टी पुनर्वसन योजनेसाठी मे.स्पार्क हे उपविकासक असून योजनेसाठी वास्तुविशारद परवानाधारक सर्व्हेअर नेमण्याची जबाबदारी मे.स्पार्क यांची आहे. सदर योजनेसाठी मे.स्पार्क यांच्यामार्फत श्री.विलास खर्चे यांची परवानाधारक सर्व्हेअर म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत लागु विकास नियंत्रण नियमावलीस अधिन राहून दिनांक २३ सप्टेंबर, २०१० रोजी सदर योजनेस इरादापत्र निर्गमित करण्यात आले.

(५) नाही.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील महामंडळावर सदस्याच्या नियुक्त्या करण्याबाबत**

**(१०) १२१९८ (२३-१२-२०१५). श्री.नरेंद्र पाटील, श्री.हेमंत टकले, ॲड.निरंजन डावखरे, श्री.सुनिल तटकरे, श्री.संदिप बाजोरिया, श्री.धनंजय मुंडे, श्री.किरण पावसकर, श्री.ख्वाजा बेग :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील महामंडळातील सदस्याच्या नियुक्त्या माहे सप्टेंबर, २०१५ पर्यत न केल्याने महामंडळाचा कारभार पूर्णक्षमतेने चालत नसल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर नियुक्त्या करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (२९-०७-२०१६) :** (१) हे खरे नाही.

(२) अशासकीय सदस्यांच्या नियुक्तीबाबत विविध राजकीय/सामाजिक क्षेत्रातील लोकप्रतिनिधी, अर्जदार, खाजगी व्यक्ती, संघटना यांचेकडून प्राप्त निवेदने/अर्जांच्या अनुषंगाने संबंधितांचे चारित्र्य पडताळणी अहवाल संबंधित पोलीस अधिकाऱ्यांकडून मागविण्यात आले आहेत. सदर चारित्र्य पडताळणी अहवाल प्राप्त होताच प्रस्ताव सादर करण्यात येऊन मा.राज्यपालांच्या मान्यतेने अशासकीय सदस्यांचा नियुक्त्या करण्यात येतील.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## महाराष्ट्र औद्योगिक किरकोळ व्यापार धोरणासंदर्भातील मसुदयाबाबत

**(११) १२२०२ (२२-१२-२०१५). श्री.नरेंद्र पाटील, श्री.किरण पावसकर, श्री.धनंजय मुंडे, ॲड.निरंजन डावखरे, श्री.सुनिल तटकरे, श्री.हेमंत टकले, श्री.संदिप बाजोरिया, श्री.ख्वाजा बेग :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाने उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाच्या महाराष्ट्र औद्योगिक धोरण १९१४/प्र.क्र.११७/उद्योग-२ प्रारुप किरकोळ व्यापार धोरण दिनांक २७ जुलै, २०१५ रोजीच्या मसुदयानुसार (Whats new) या संकेत स्थळावर जनतेच्या सूचना व हरकती मागविण्यात आल्या होत्या, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, साधारणत: किती लोकांकडून सूचना व हरकती प्राप्त झाल्या व त्यातील किती सूचना व हरकती स्वीकारण्यात आल्या आहेत,

(३) असल्यास, अंमल करण्यात आलेल्या सूचना व हरकतींवर शासनाने अहवाल तयार केला आहे काय,

(४) असल्यास, प्रस्तावित मसूद्याचे प्रारुप काय आहे,

(५) असल्यास, कामगारांच्या उदरनिर्वाहाचा गंभीर प्रश्न निर्माण होऊ नये म्हणून शासनाने सदर मसुद्यात कोणत्या तरतुदी केल्या आहेत ?

**श्री. सुभाष देसाई (२२-०१-२०१६) :** (१) होय.

(२) व (३) प्रस्तावित महाराष्ट्र किरकोळ व्यापार धोरण- २०१५ संदर्भात प्राप्त झालेल्या हरकती व सूचना यावर चर्चा करण्यासाठी दिनांक ४ सप्टेंबर, २०१५ रोजी रिटेल असोशिएशन सोबत बैठक घेण्यात आली.

जनतेकडून तसेच विविध किरकोळ विक्रेता संघटना/असोशिएशन कडून प्राप्त झालेल्या हरकती/सूचना यांचा विचार प्रस्तुत धोरणाची आखणी करताना केला आहे.

(४) व (५) दिनांक १९ जानेवारी, २०१६ रोजी राज्य मंत्रीमंडळाच्या बैठकीत राज्याचे किरकोळ व्यापार धोरण-२०१६ ला मान्यता देण्यात आली असून शासन निर्णय क्र. किविधो-२०१५/प्र.क्र.११३/उद्योग-२, दिनांक १० फेब्रुवारी, २०१६ रोजी निर्गमित करण्यात आला आहे.

---

## राज्यातील लोककलावंताच्या मागण्यांबाबत

**(१२) १२३४७ (२२-१२-२०१५). श्रीमती विद्या चव्हाण, श्री.सतिश चव्हाण, श्री.हेमंत टकले, श्री.जयवंतराव जाधव, श्री.अमरसिंह पंडित, श्री.नरेंद्र पाटील, श्री.अनिल भोसले, श्री.किरण पावसकर, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.ख्वाजा बेग :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील लोककलावंताना दुप्पट मानधन करण्यात यावे तसेच अन्य मागण्यांबाबत माहे डिसेंबर, २०१५ मध्ये जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आंदोलन करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, लोककलावंतांच्या मागण्या कोणकोणत्या आहेत,

(३) तसेच, यापैकी कोणकोणत्या मागण्या मान्य करण्यात आल्या आहेत व उर्वरीत मागण्यांबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२७-०१-२०१६) :** (१) नाही.
या अनुषंगाने संबंधितांकडून किंवा जिल्हाधिकारी कार्यालयाकडून असा प्रस्ताव आल्याचे दिसून येत नाही.
(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विमुक्त जाती, भटक्या जमाती कनिष्ठ महाविद्यालयाचे वेतन अनुदान बंद केल्याबाबत**

**(१३) १२६२२ (२३-१२-२०१५). श्री.रामनाथ मोते, श्री.नागो गाणार, डॉ.अपूर्व हिरे :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सामाजिक न्याय विभागाने दिनांक २६ जून, २००८ च्या शासन निर्णयानुसार विमुक्त जाती भटक्या जमातीच्या किती माध्यमिक आश्रमशाळांना श्रेणीवाढ देवून कनिष्ठ महाविद्यालयाचे वर्ग सुरु करण्यास परवानगी दिली आहे काय,
(२) असल्यास, सन २००८-०९ मध्ये किती आश्रमशाळांमध्ये उच्च माध्यमिकचे वर्ग सुरु झाले होते व त्यासाठी शासन निर्णयाच्या अनुषंगाने अनुदानासाठी कोणते निकष निश्चित करण्यात आले होते,
(३) असल्यास, या शाळांचे सन २०१४-१५ चे टप्पा अनुदान व २०१५-१६ चे १०० टक्के वेतन अनुदान बंद करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, सन २०१४-१५ व सन २०१५-१६ चे अनुदान बंद करण्याची कारणे काय आहेत,
(५) असल्यास, महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषदेचे कार्याध्यक्ष व कोकण विभाग शिक्षक मतदार संघाचे लोकप्रतिनिधी यांनी दिनांक ३० सप्टेंबर, २०१५ रोजी वा सुमारास शासनास निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,
(६) असल्यास, सदर निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (२९-०७-२०१६) :** (१) या विभागाच्या दिनांक २६ जून, २००८ च्या शासन निर्णयान्वये १२५ उच्च माध्यमिक आश्रमशाळांना परवानगी देण्यात आली.
(२) सन २००८-०९ मध्ये १२५ उच्च माध्यमिक आश्रमशाळांचे वर्ग सुरु झाले होते. शासन निर्णय दिनांक २६ जून, २००८ च्या निर्णयातील अटी व शर्तीनुसार निकष निश्चित करण्यात आले आहे.

(३) व (४) सदर पदांना उच्चस्तरीय सचिव समितीची मान्यता नसताना व त्यासाठी कोणतीही वित्तीय तरतूद केलेली नसताना क्षेत्रीय स्तरावरील कार्यालयांनी दिनांक २६ जून, २००८ च्या शासन निर्णयाचा चुकीचा अर्थ लावून उच्च माध्यमिक आश्रशाळांना २५ ते ७५% अनुदान वाटप केल्याची बाब निदर्शनास आल्यामुळे अनुदान बंद करण्यात आले आहे.
(५) होय.
(६) व (७) सदर प्रस्तावासंदर्भात उच्चाधिकार समितीने उपस्थित केलेल्या मुद्दयांच्या माहितीसह व मा.उच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार प्रस्ताव मंत्रिमंडळासमोर सादर करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

---

## मुंबईसह राज्यातील अनेक शहरांमध्ये महिलांसाठी स्वच्छतागृहे बांधण्याबाबत

**(१४) १२७८३ (२३-१२-२०१५). डॉ.अपूर्व हिरे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईसह राज्यातील अनेक शहरांमध्ये अपु-या स्वच्छतागृहांमुळे महिलांची होणारी कुचंबना लक्षात घेवून महिलांसाठी स्वच्छतागृहे प्राधान्याने बांधण्याबाबत शासनाने सर्व महानगरपालिकांना सुचना दिल्या आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, स्वच्छ महाराष्ट्र अभियानांतर्गत तरंगती लोकसंख्या असलेल्या सार्वजनिक ठिकाणी पुरेशा संख्येने सार्वजनिक शौचालये उभारून त्यामध्ये पुरूषांसाठी व महिलांसाठी स्वतंत्र व्यवस्था करण्याबाबतच्या सुचनाही शासनस्तरावरून देण्यात आल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, मा.उच्च न्यायालयाचे आदेशानुसार उक्त प्रकरणी कार्यवाही विहीत कालावधीत करण्याबाबत शासनाकडून निर्देशित करण्यांत आले होते असे असूनही महिलांसाठी पुरेशी स्वच्छतागृहे उपलब्ध करून देण्याबाबत विविध महानगरपालिकामार्फत आवश्यक कार्यवाही करण्यात आलेली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, किमान मोठ्या लोकसंख्येच्या महानगर/शहरांमध्ये उपरोक्त प्रकरणी काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०९-०८-२०१६) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय हे खरे आहे.
(३) व (४) मा.उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार अपुऱ्या स्वच्छतागृहांमुळे महिलांची होणारी कुचंबणा लक्षात घेवून महिलांसाठी पुरेशी स्वच्छतागृहे उपलब्ध करुन देण्याबाबत महानगरपालिकेमार्फत विहित कालावधीत आवश्यक कार्यवाही करण्याबाबतच्या सूचना सर्व संबंधित महानगरपालिकांना शासन स्तरावरुन देण्यात आलेल्या आहेत. स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) अंतर्गत तरंगती लोकसंख्या असलेल्या सार्वजनिक ठिकाणी पुरेशा संख्येने

सार्वजनिक शौचालये उभारुन त्यामध्ये पुरुषांसाठी व महिलांसाठी स्वतंत्र व्यवस्था करण्याबाबतच्या सूचना सर्व संबंधित महानगरपालिकांना शासन स्तरावरुन देण्यात आल्या आहेत. त्याअनुषंगाने राज्यातील महानगरपालिकांकडून कार्यवाही करण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मीरा-भाईंदर शहरातील अनधिकृत बांधकामांना पुरविण्यात आलेल्या वीज पुरवठ्यावर जादाची वसूली करण्याबाबत**

**(१५) १३०६१ (२१-१२-२०१५). श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.संजय दत्त :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मीरा-भाईंदर शहरात अनधिकृत बांधकामांना वीजपुरवठा देण्यात मंजूरी दिली असल्याचे माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अनधिकृत बांधकामांवर जास्तीची वसूली करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०३-०९-२०१६) :** (१) हे खरे नाही.
(२) प्रश्न उद्‌भवत नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**सोलापूर जिल्ह्यातील शाळांच्या वेतनेतर अनुदानाबाबत**

**(१६) १४१०४ (२२-१२-२०१५). श्री.दत्तात्रय सावंत :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात माहे एप्रिल, २००८ मध्ये १००% नॉनप्लन मध्ये असलेल्या शाळा वेतनेतर अनुदानास पात्र ठरविण्यात आल्या आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सोलापूर जिल्ह्यातील किती शाळा वेतनेतर अनुदानासाठी पात्र ठरल्या आहेत,
(३) असल्यास, सोलापूर जिल्ह्यातील किती शाळांना वेतनेतर अनुदानाची रक्कम अदा केली आहे.
(४) नसल्यास, वेतनेतर अनुदानाची रक्कम अदा न करण्याची कारणे काय आहे ?

**श्री. विनोद तावडे (०७-०९-२०१६) :** (१) होय.
(२) सोलापूर जिल्ह्यातील १५८ शाळा वेतनेतर अनुदानासाठी पात्र ठरल्या आहेत.
(३) सोलापूर जिल्ह्यातील १२३ शाळांना वेतनेतर अनुदानाची रक्कम अदा करण्यात आलेली आहे.
(४) शाळांकडून वेतनेतर बँक खाते क्रमांक व इतर आवश्यक माहिती वारंवार मागणी करुनही मिळत नसल्यामुळे वेतनेतर अनुदान वितरीत करता आलेली नाही.

---

**गरीब रुग्णांना मोफत रुग्णवाहिका सेवा देण्याबाबत**

**(१७) १४२१० (२२-१२-२०१५). श्री.सुभाष झांबड, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.संजय दत्त :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाने गरीब रुग्णांसाठी १०८ अत्यावश्यक हेल्पलाईन सुरू करण्यात आलेली रुग्णवाहिका सेवा ३० कि.मी. पर्यंत लागू आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ग्रामीण भागातील वाड्या, खेडयामधून रुग्णांना रुग्णालयात दाखल करताना ३० कि.मी. पेक्षा जास्त अंतरावर रुग्णालयात जावे लागत असल्याने त्यावेळी खाजगी रुग्णवाहिका घ्यावी लागत असल्याने आर्थिक अडचणींमुळे गरीब रुग्णांना प्राण गमवावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत धोरणात बदल करून गरीब रुग्णांना पुर्णपणे मोफत रुग्णवाहिका सेवा देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (०२-०८-२०१६) :** (१) हे खरे नाही.

अपघातग्रस्तांना रुग्णालयात दाखल करताना ३० किलोमीटरपर्यंतची मर्यादा लागू असणे अशी कुठलीही मर्यादा नाही.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**प्राथमिक व उच्च माध्यमिक शाळेतील पोषण (शालेय) आहार योजनेच्या आहारासाठी खर्चात वाढ करण्याबाबत**

**(१८) १४२६६ (२२-१२-२०१५). प्रा.जोगेन्द्र कवाडे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) प्राथमिक व उच्च माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांसाठी शासनाकडून राबविली जाणारी पोषण (शालेय) आहार योजनेचा आहार चांगला असावा यासाठी समन्वय साधून या वर्षासाठी सदरील योजनेच्या खर्च मर्यादेत वाढ करण्याची मागणी शिक्षक व शिक्षक संघटनांनी केली असतानाही शासनाने या योजनेत फक्त ५ टक्के एवढी वाढ केल्याने या किरकोळ दरवाढीच्या सहाय्याने मुलांना चांगल्या दर्जाचा आहार पुरविणे शक्य होत नसल्याचे मत मुख्याध्यापक संघटनेच्या अध्यक्षांनी व्यक्त केल्याचे माहे ऑक्टोबर, २०१५ च्या दुसऱ्या सप्ताहात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त शालेय पोषण आहार योजनेत महागाईच्या दृष्टीने वाढ करण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२६-०८-२०१६) :** (१) व (२) शालेय पोषण आहार योजना ही केंद्र पुरस्कृत योजना असून केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार शासकीय शाळा, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळा, खाजगी अनुदानित/अंशत: अनुदानित शाळा, बालकामगार प्रकल्प इ. मधील इयत्ता १ ली ते ८ वी. च्या विद्यार्थ्यांकरिता राबविण्यात येते.

केंद्र शासन दरवर्षी अन्न शिजविण्याच्या दरात वाढ करते. केंद्र शासनाच्या निर्देशानुसार दिनांक ९ मार्च, २०१६ च्या शासन निर्णयानुसार शालेय पोषण आहार योजनेंतर्गत अन्न शिजविण्याच्या दर निश्चित करण्यात आले आहेत. केंद्र शासनाने दिनांक १ जुलै, २०१६ च्या पत्रान्वये अन्न शिजविण्याच्या दरात सन २०१६-१७ करिता ७% वाढ करण्याचे निर्देश दिलेले आहेत. यानुसार दरवाढ करण्याबाबत पुढील कार्यवाही सुरु आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यात वेगवेगळया ठिकाणी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने केलेल्या कारवाईबाबत**

**(१९) १४८०६ (०१-०६-२०१६). श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात वेगवेगळया ठिकाणी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने केलेल्या कारवाईत ४२ अधिकारी व कर्मचा-यांना दोषी ठरविण्यात आले असुन त्यांना शासकीय सेवेतुन बडतर्फ करण्यात आले नसल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, दिनांक १ जानेवारी, २०१५ ते ३१ डिसेंबर, २०१५ अखेर राज्यामध्ये लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने किती लाचखोर व्यक्तींना पकडले आहे,
(३) असल्यास, पकडण्यात आलेल्या किती व्यक्तींवर अंतिम कारवाई करण्यात आली वा येत आहे, तसेच राज्य लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने गुन्हे दाखल केल्यापैकी किती प्रकरणे राज्याच्या विविध न्यायालयात प्रलंबित आहेत,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२९-०७-२०१६) :** (१) लाचलुचपत प्रतिबंध अधिनियमांतर्गत दाखल खटल्यात दोषी ठरवण्यात आलेल्या ४६ अधिकारी व कर्मचाऱ्यांना जानेवारी, २०१६ पर्यंत शासकीय सेवेतून बडतर्फ करण्यात आले नसल्याबाबत वृत्तपत्रात बातमी प्रसिध्द झाली होती. तथापि, सदर ४६ लोकसेवकांपैकी २३ लोकसेवकांना शासन सेवेतून काढून टाकण्यात आहे. २ लोकसेवकांबाबतची प्रकरणे महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या सहमतीसाठी पाठविली आहेत. ५ प्रकरणी मा.न्यायालयाची स्थगिती आहे. तसेच ४ अधिकारी/कर्मचारी सेवानिवृत्त झाले असून १२ प्रकरणी संबंधित विभागाकडून बडतर्फीची कार्यवाही सुरु असल्याचे निदर्शनास आले आहे.
(२) दिनांक १ जानेवारी, २०१५ ते ३१ डिसेंबर, २०१५ या कालावधीत राज्यामध्ये लाचलुचपत प्रतिबंधक विभागाद्वारे सापळा कारवाईत १५९३ अपसंपदा प्रकरणी ५५ व अन्य भ्रष्टाचाऱ्याच्या प्रकरणी ६४ अशा एकूण १७२२ व्यक्तींना पकडण्यात आले आहे.
(३), (४) व (५) आजपर्यंत लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने दाखल केलेल्या गुन्ह्यांमध्ये संबंधित न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केली जातात. अशी ४०६७ प्रकरणे राज्याच्या विविध न्यायालयात प्रलंबित आहेत.

---

**रायगड पोलीस दलातील रिक्त पदांबाबत**

**(२०) १४९०६ (२९-०४-२०१६). श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड पोलीस विभागासाठी श्रेणी १ ते ४ मधील एकूण मंजूर पदे किती आहेत,

(२) असल्यास, एकूण मंजूर पदांपैकी किती रिक्त पदे आहेत, रिक्त पदे भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०२-०९-२०१६) :** (१) रायगड जिल्हयातील पोलीस विभागात वर्ग-१ ची ४२ पदे, वर्ग-२ ची ४४ पदे, वर्ग-३ ची २७०७ व वर्ग-४ ची ३६ पदे अशी एकूण २८२९ पदे मंजूर आहेत.

(२) एकूण मंजूर पदांपैकी वर्ग-१ ची ९ पदे, वर्ग-२ ची ११ पदे, वर्ग-३ ची ३६९ पदे, वर्ग-४ ची १६ पदे अशी एकूण ४०५ पदे रिक्त आहेत. रिक्त पदे भरण्याबाबतची कार्यवाही विविध स्तरावरुन चालू आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**आर्थिक दृष्टया मागासलेल्या विद्यार्थीकरिता खरेदी करण्यात आलेले सोलर हिटर बंद असल्याबाबत**

**(२१) १५१८४ (२८-०४-२०१६). प्रा.अनिल सोले, श्री.मितेश भांगडिया, श्री.नागो गाणार :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आर्थिक दृष्टया मागासलेल्या विद्यार्थीकरिता वसतिगृहात सोलर वॉटर हिटरची व्यवस्था करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वसतिगृहांची व विद्यार्थीची संख्या किती आहे, वसतिगृहांसाठी किती सोलर वॉटर हिटर व केव्हा खरेदी करण्यात आले, सदर वसतिगृहातील सोलर वॉटर हिटर हिवाळ्यात बंद असल्याची तक्रार करण्यात आली होती, हे ही खरे आहे काय,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (१९-०८-२०१६) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) राज्यात ३८१ शासकीय वसतिगृहात २८९३५ विद्यार्थी प्रवेशित आहेत. त्यापैकी १६९ वसतिगृहांमध्ये दिनांक १७ मार्च, २०११ रोजीच्या पुरवठा आदेशान्वये ७३३ सोलर वॉटर हिटरचा पुरवठा केलेला आहे. त्यापैकी १५४ नग बंद आहेत.

(३) बंद सोलर वॉटर हिटरची तात्काळ दुरुस्ती करुन ती पूर्ववत करण्याच्या सूचना पुरवठाधारकास दिलेल्या आहेत.

---

**राज्य अपंग वित्त आणि विकास महामंडळाने करावयाच्या कर्ज वाटपाबाबत**

**(२२) १५२३२ (२७-०४-२०१६). प्रा.अनिल सोले, श्री.मितेश भांगडिया, श्री.नागो गाणार :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात अपंग वित्त आणि विकास महामंडळाची समाजाच्या आर्थिक विकासाकरिता स्थापना केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन २०१४-१५ व २०१५-१६ या आर्थिक वर्षात किती नागरिकांनी अर्ज केले व प्रत्यक्षात किती लाभार्थींना किती रक्कमेचे कर्ज वाटप झाले आहे, तसेच केलेले कर्जवाटप व कर्मचारी वर्गाच्या वेतनाची रक्कम किती आहे,

(३) नसल्यास, कर्ज वाटप न करण्याची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (२९-०७-२०१६) :** (१) होय. राज्यातील अपंग व्यक्तींच्या आर्थिक विकासाकरिता शासनामार्फत महाराष्ट्र राज्य अपंग वित्त व विकास महामंडळाची स्थापना करण्यात आली आहे.

(२) महाराष्ट्र राज्य अपंग वित्त व विकास महामंडळास सन २०१४-१५ मध्ये १६३८ अर्ज प्राप्त झाले असून त्यापैकी १९९७ लाभार्थींना एकूण रुपये १३,६३,९५,५६९/- व सन २०१५-१६ मध्ये २४३८ प्राप्त अर्जापैकी २३११ लाभार्थींना एकूण रुपये २०,५१,२१,०६७/- इतक्या रक्कमेचे कर्ज वाटप करण्यात आले आहे. तसेच, सन २०१४-१५ मध्ये एकूण रुपये १,८८,६१,४६०/- व सन २०१५-१६ मध्ये एकूण रुपये २,०२,२४,९४५/- इतकी रक्कम महामंडळातील कर्मचाऱ्यांच्या वेतनावर खर्च करण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मॉडेल हायस्कूल, धनोडी (मु.मोठी आजी, ता.जि.वर्धा) येथील श्री.बी.एम.देवतारे, सेवानिवृत्त शिक्षक यांना निवृत्ती वेतन लाभाकरिता नियमित करण्याबाबत**

**(२३) १५३२७ (२९-०४-२०१६). श्री.नागो गाणार, प्रा.अनिल सोले, श्री.मितेश भांगडिया :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मॉडेल हायस्कूल, धनोडी (मु.मोठी आजी, ता.जि.वर्धा) येथील श्री.बी.एम.देवतारे, सेवानिवृत्त शिक्षक यांना न्यायालयीन आदेशान्वये न्यायप्रविष्ठ कालावधीत निवृत्ती वेतन लाभाकरिता नियमित करण्याबाबत नागपूर विभागाच्या लोकप्रतिनिधींनी व अर्जदारांनी शासनाकडे आणि शिक्षण विभागाकडे सन २०१२ पासून अनेकवेळा विनंती पत्रे दिली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी अद्यापपर्यंत त्यांच्या न्यायप्रविष्ठ कालावधी निवृत्ती वेतन लाभाकरिता नियमित करण्यासंबंधी शासन आदेश देण्यात आलेले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (३१-०८-२०१६) :** (१) होय हे खरे आहे.

(२) व (३) शासन स्तरावर कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### राज्यात दोषी संचालकास सहकारी बँक निवडणूक लढण्यास बंदी घालण्याबाबत

**(२४) १५४८३ (२८-०४-२०१६). श्री.जनार्दन चांदूरकर, श्री.संजय दत्त, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सहकारी बँकेत अनियमितता आढळल्यास कलम ८३ अन्वये चौकशी करुन संचालकावर कलम ८८ नुसार निवडणूक बंदीची तरतूद असताना शासन याबाबत दुर्लक्ष करीत असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (०३-०८-२०१६) :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### राज्यातील इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळाकडून लाभार्थ्यांना कर्ज वाटप होत नसल्याबाबत

**(२५) १५६२६ (२८-०४-२०१६). श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, प्रा.अनिल सोले, श्री.मितेश भांगडिया, श्री.नागो गाणार :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील इतर मागासवर्गीय महामंडळासाठी शासनाने पुरेसा निधी उपलब्ध केला नसल्याने इतर मागासवर्गीय गरजू उमेदवारांना अनुदान मिळत नसल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या महामंडळासाठी पुरेसा निधी उपलब्ध करण्यासाठी कोणती कार्यवाही करण्यात आली आहे वा किती जणांना त्याचा लाभ मिळणार आहे याबाबतचा तपशील काय आहे,

(३) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (१२-०८-२०१६) :** (१) व (२) महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळास शासनाकडून प्राप्त झालेल्या व महामंडळाकडे शिल्लक असलेल्या भाग भांडवल निधीतून तसेच लाभार्थ्यांकडून वसूलीपोटी जमा असलेल्या रक्कमेतून योजनांतर्गत मंजूरी व कर्ज वितरण करण्यात आलेले आहे. आतापर्यंत राज्य महामंडळाच्या व राष्ट्रीय महामंडळाच्या योजनांतर्गत एकूण १६७२ अर्जदार लाभार्थींना एकूण रुपये ३,८१,२३,०००/- इतक्या रक्कमेचे कर्ज वाटप करण्यात आलेले आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**दमणगंगा पिंजाळ राष्ट्रीय नदी जोड प्रकल्पाचा सामंजस्य करार अंतिम करण्याबाबत**

**(२६) १५६५६ (०२-०५-२०१६). श्री.सुभाष झांबड, श्री.संजय दत्त, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.जयवंतराव जाधव, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.नरेंद्र पाटील, श्री.आनंद ठाकूर :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दमणगंगा पिंजाळ राष्ट्रीय नदी जोड प्रकल्पाचा सामंजस्य करार अंतिम करण्यासाठी शासनाने दिनांक १७ एप्रिल, २०१५ रोजी केंद्र शासनास संमती दिल्याची गंभीर बाब निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील तापी व गोदावरी खोऱ्यात पाणी उपलब्ध असताना त्यावर राष्ट्रीय नद्याजोड प्रकल्पांतर्गत नार गिरणा लिंक, पार कालवा लिंकसह राज्याच्या उपयुक्ततेसाठी आवश्यक असलेले पाणी प्रकल्प राबविण्याऐवजी गुजरात धार्जिणे दमणगंगा लिंक प्रकल्प राबवून राज्य शासन हक्काच्या पाण्यावरील अधिकारी सोडत असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(३) महाराष्ट्र-गुजरात सीमेवरील दमणगंगा व पार खोऱ्याच्या पाणलोट क्षेत्रातील संपूर्ण पाण्यावर महाराष्ट्राचा हक्क अबाधित राहण्यासाठी लोकप्रतिनिधींनी माहे ऑगस्ट, २०१५ वा त्यादरम्यान काही सूचना केलेल्या आहेत, हे खरे आहे काय,

(४) तसेच लोकप्रतिनिधींच्या सुचनांबाबत कार्यवाही केल्याशिवाय दमणगंगा पिंजाळ सामंजस्य करार अंतिम केला जावू नये अशी लोकप्रतिनिधींनी माहे ऑक्टोंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान शासनाकडे मागणी केलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) तसेच दमणगंगा आणि पार खोऱ्यातील महाराष्ट्राच्या हद्दीतील पाण्याचा सुधारित अभ्यास करून सुधारीत पाणी उपलब्धता निश्चित करण्यासाठी लोकप्रतिनिधींनी माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान शासनाकडे मागणी केलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. गिरीष महाजन (२३-०६-२०१६) :** (१) नाही. महाराष्ट्रास दमणगंगा पिंजाळ नदीजोड योजना राबवण्यात स्वारस्य आहे. या योजनेच्या सामंजस्य कराराचा मसुदा तयार करणेत यावा असे जलसंसाधन मंत्रालयास व राष्ट्रीय जलविकास अभिकरणास कळविले होते.

(२) हे खरे नाही.

(३) होय.

(४) होय.

(५) होय.

(६) राष्ट्रीय जलविकास अभिकरणाने दमणगंगा पिंजाळ व पार-तापी-नर्मदा या दोन्ही जोड योजनांचे सविस्तर प्रकल्प अहवाल तयार केलेले आहेत. दमणगंगा पिंजाळ योजनेच्या प्रकल्प अहवालाची छाननी करून त्यावरील अभिप्राय राष्ट्रीय जलविकास अभिकरणास दिनांक २३ एप्रिल, २०१५ रोजी पाठविले आहेत. नार-पार-तापी-नर्मदा योजनेचा प्रकल्प अहवाल दिनांक २ सप्टेंबर, २०१५ रोजी प्राप्त झाला असून त्याची छाननी झाली आहे.

दमणगंगा-पिंजाळ व पार-तापी-नर्मदा या राष्ट्रीय जलविकास अभिकरणाने प्रस्तावित केलेल्या राष्ट्रीय नदी जोड प्रकल्पांबाबत राज्याची भुमिका निश्चित करण्याचे दृष्टीने दमणगंगा, नार-पार, औरंगा, अंबिका या नदीखोऱ्यातील राज्यातील जलनियोजन (पाणी वापराचे बृहतआराखडा) अंतिम करणे गरजेचे आहे. याकरिता शासन निर्णय दिनांक ४ एप्रिल, २०१६ रोजीच्या शासन निर्णयान्वये मुख्य अभियंता स्तरावरील समिती गठीत करण्यात आली आहे. सदर समिती खोऱ्यातील पाणी उपलब्धता, कोकणातील स्थानिक पाण्याची गरज यासाठीचे कोकणातील पूर्ण, बांधकामाधीन व भविष्यकालीन प्रकल्प तसेच तांत्रिक व आर्थिकदृष्ट्या व्यवहार्य गोदावरी व तापी खोऱ्यातील पूर्ण बांधकामाधीन व प्रस्तावित वळण योजनांचा अभ्यास करून पाणी वापराचा बृहत आराखडा शासनास सादर करणार आहे.

या नदी खोऱ्यातील विविध प्रवर्गाची पाणी मागणी विचारात घेऊन जलनियोजनबाबतचा धोरणात्मक निर्णय घेण्यात येईल.

---

**ओरस (जि.सिंधुदुर्ग) येथील मुंबई-गोवा महामार्गालगतच्या पूर्व दिशेकडील भूखंडावरील परंपरागत निवासी व शेती वापर झोन उठविण्याबाबत**

**(२७) १५९३७ (२८-०४-२०१६). श्री.रामनाथ मोते, श्री.नागो गाणार, डॉ.अपूर्व हिरे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ओरस (जि.सिंधुदुर्ग) येथील मुंबई-गोवा महामार्गालगतच्या पूर्व दिशेकडील भूखंडावरील परंपरागत निवासी व शेती वापर झोन उठविण्याबाबत मा.मुंबई उच्च न्यायालयाने दिनांक २७ एप्रिल, २०१५ रोजी वा त्यासुमारास आदेश दिले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सिंधुदुर्ग नवनगर प्राधिकरणासाठी ओरस, रानबांबुळी आणि आणाव या गावांमधील किती हेक्टर क्षेत्र संपादित करण्यात आले होते व मा.मुंबई उच्च न्यायालयाने किती हेक्टरवरील आरक्षण उठविण्याचे निर्देश दिले होते,

(३) असल्यास, मा.न्यायालयाच्या आदेशानुसार कार्यवाही पूर्ण करण्यात आली आहे काय व केव्हा,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१०-०८-२०१६) :** (१) सिंधुदूर्ग नगरी नवनगर विकास प्राधिकरण क्षेत्राकरीता अधिसूचित क्षेत्रापैकी शेती तथा परंपरागत निवासी वापराखालील ७० हेक्टर क्षेत्र वगळणेबाबतचा सिंधुदूर्ग नवनगर विकास प्राधिकरणाने शासनाकडे सादर केलेल्या प्रस्तावावर चार महिन्यामध्ये निर्णय घेण्याचे आदेश मा.उच्च न्यायालयाने दिनांक ११/१२/२०१४ रोजीच्या सुनावणी दरम्यान शासनास दिले होते.

(२) मौजे ओरस, रानबांबूळी व आणाव या तीन गावातील ३४२.६९.५७ हे. आर. क्षेत्र संपादीत करण्यात आले होते. सिंधुदूर्ग नगरी नवगर विकास प्राधिकरणाच्या मंजूर विकास आराखड्यातील ४३०.३३ हेक्टर क्षेत्रापैकी मुंबई-गोवा या राष्ट्रीय महामार्ग क्र.१७ लगतचे पूर्व व पश्चिम दिशेकडील एकूण ११५.३७ हेक्टर क्षेत्र शेती तथा परंपरागत निवासी वापर विभागासाठी

राखीव आहे. सदर क्षेत्रापैकी राष्ट्रीय महामार्गाच्या पूर्वेकडील सुमारे ७० हेक्टर क्षेत्र अधिसूचित क्षेत्रामधून वगळणेबाबतचा प्रस्ताव सिंधुदूर्ग नगरी नवनगर विकास प्राधिकरणाने शासनास सादर केला होता. त्यावर निर्णय घेण्याचे आदेश मा.उच्च न्यायालयाने दिले होते.

(३) नगर विकास विभागाकडील अधिसूचना क्र. टिपीएस-१२१४/१८६१/प्र.क्र.४४/१५/नवि-१२, दिनांक २७/४/२०१६ अन्वये सिंधुदूर्गनगरी नवनगर प्राधिकरणाकरिता अधिसूचित केलेल्या क्षेत्रापैकी राष्ट्रीय महामार्ग क्र.१७ च्या पूर्वेकडील ७० हेक्टर क्षेत्र वगळण्यात आले आहे. सदर अधिसूचना महाराष्ट्र शासनाचे राजपत्र कोकण विभागीय पूरवणी २१-२७ मे, २०१५ मध्ये प्रसिध्द करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील विमुक्त जाती, भटक्या जमातीच्या अनुदानित आश्रमशाळांतील शिक्षक कर्मचाऱ्यांसाठी शाळा संहितेचे सुधारीत प्रारुप मंजूर करणेबाबत**

**(२८) १६०२४ (२७-०४-२०१६). श्री.विक्रम काळे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.दत्तात्रय सावंत, डॉ.सुधीर तांबे, श्री.सतिश चव्हाण :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील विमुक्त जाती, भटक्या जमातीच्या अनुदानित आश्रमशाळांमध्ये कार्यरत शिक्षक-कर्मचाऱ्यांसाठी शाळा संहितेचे सुधारीत प्रारुप मंजूर करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने घेतलेल्या निर्णयाचे स्वरुप काय आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (२७-०७-२०१६) :** (१), (२) व (३) राज्यातील विमुक्त जाती, भटक्या जमातीच्या अनुदानित आश्रमशाळासाठीच्या आश्रमशाळा संहितेचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.

---

**नागपूर विभागात जलयुक्त शिवारच्या योजना प्रभावीपणे राबविण्याबाबत**

**(२९) १६१२५ (०२-०५-२०१६). श्री.प्रकाश गजभिये, श्री.रामराव वडकुते, श्री.राजेंद्र जैन, श्री.ख्वाजा बेग, श्री.संदिप बाजोरिया :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जलयुक्त शिवार योजनेच्या माध्यमातून पाणीटंचाईवर मात करण्याबाबत दुसऱ्या टप्प्यात नागपूर विभागातील किती गावांची निवड करण्यात आली आहे,

(२) असल्यास, आतापर्यंत किती जलयुक्त शिवार योजनांची कामे सुरु आहेत,

(३) असल्यास, जलयुक्त शिवार अभियान अधिक प्रभावीपणे राबविण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) असल्यास, याबाबत किती खर्च अपेक्षित आहे ?

**श्री. राम शिंदे (०५-०८-२०१६) :** (१) जलयुक्त शिवार योजनेच्या माध्यमातून पाणीटंचाईवर मात करण्यासाठी दुसऱ्या टप्प्यात नागपूर विभागातील ९०४ गावांची निवड करण्यात आली आहे.
(२) सन २०१६-१७ मध्ये नागपूर विभागात दुसऱ्या टप्प्यात ४७८ गावात १६६२ जलयुक्त शिवार योजनांची कामे सुरु आहेत.
(३) जलयुक्त शिवार अभियान प्रभाविपणे राबविण्यासाठी शासनाच्या नियमित योजनेतून जलसंधारणाची विविध कामे हाती घेण्यात आली आहेत. सदर कामांसाठी नागपूर विभागास सन २०१५-१६ करिता रुपये ३१६ कोटी "विशेष निधी" दिलेला आहे. ह्या व्यतिरिक्त लोकसहभागातून व शासकिय माध्यमातून नदी, नाले व गावतलाव यातील गाळ काढणे, खोलीकरण करणे, रुंदीकरण करणे सुरु आहे.
(४) नागपूर विभागातील दुसऱ्या टप्प्यात ९०४ गावांमध्ये २८७४० कामांचा रुपये ७५०.३५ कोटी रुपयांचा कृती आराखडा मंजूर करण्यात आला आहे.

---

**मौजे बेलोशी (ता.अलिबाग, जि.रायगड) येथील एका हरवलेल्या मुलाच्या तपासाबाबत**

**(३०) १६५४५ (२८-०४-२०१६). श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अलिबाग (जि.रायगड) तालुक्यातील मौजे बेलोशी येथील रजत सुधाकर निरकर हा दिनांक १ जानेवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास कामावर जातो असे सांगून घरी परत न आल्याने दिनांक २५ नोव्हेंबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास सौ. रंजना सुधाकर निरकर, रा. बेलोशी यांनी जिल्हा पोलीस अधीक्षक, रायगड यांचेकडे श्रीधर भोपी व त्यांचे नातेवाईक यांचेविरुध्द मुलाचे अपहरण केल्याबाबत तक्रार केली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सौ. रंजना सुधाकर निरकर यांनी जिल्हा पोलीस अधीक्षक, रायगड यांचेकडे श्रीधर मधुकर भोपी व त्यांचे नातेवाईक यांचेविरुध्द चौकशी करण्यात आली आहे काय,
(३) असल्यास, तपासात काय निदर्शनास आले व तदनुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (२२-०९-२०१६) :** (१) हे खरे आहे.
(२) होय.
(३) सदर प्रकरणातील तपासात श्रीधर भोपी, मानसी पडते, तसेच राकेश भोपी यांची चौकशी केली असता कोणत्याही प्रकारची उपयुक्त माहिती प्राप्त झालेली नाही. त्यामुळे श्रीधर भोपी यांची "Polygraph Examination" व "Forensic Psychology" या चाचण्या घेऊन त्यांच्या जबाबाची सत्यता पडताळण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाचे पुर्नरूज्जीवन करण्याबाबत**

**(३१) १६८६० (२७-०४-२०१६). श्री.शरद रणपिसे :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या बस सेवेवर विविध कारणांमुळे परिणाम होऊन महामंडळाचे कोट्यवधी रुपयांचे नुकसान होत असल्यामुळे एसटी महामंडळाचे नुकसान रोखण्यासाठी तसेच एसटी महामंडळाचे प्रवासी आणि कर्मचाऱ्यांसाठी नव्या सुविधा उपलब्ध करुन एसटी महामंडळाचे पुर्नरुज्जीवन करण्याबाबतचा निर्णय माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान घेण्यात आलेला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, निर्णयाचे स्वरुप काय आहे व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (३१-०८-२०१६) :** (१) व (२) महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या प्रवासी व कर्मचाऱ्यांच्या सोयी सुविधांकरिता कन्यादान योजना, अपघात सहाय्यता निधी योजना, 'शिवशाही' या नावाने वातानुकूलित बस सेवा अशा प्रकारच्या नवीन योजना/सेवा सुरु करण्याबाबत महामंडळाच्या स्तरावर निर्णय घेण्यात आलेला आहे. तसेच महामंडळाचे नुकसान रोखण्यासाठी अवैद्य प्रवासी वाहतुकीवर निर्बंध लावण्यासाठी आर.टी.ओ. व पोलीस यांची मदत घेवून तपासणी कार्यक्रम राबविण्यात येत आहे. तसेच वाहकांकडून होणारा अपहार टाळण्यासाठी मार्ग तपासणी कार्यक्रम वेळोवेळी राबविण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यातील पतसंस्थाची चळवळ सशक्त करण्यासाठी**
**स्वतंत्र मंडळ स्थापन करण्याच्या प्रस्तावाबाबत**

**(३२) १७२२९ (२७-०४-२०१६). श्री.शरद रणपिसे :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील पतसंस्थाची चळवळ सशक्त करण्यासाठी स्वतंत्र मंडळ स्थापन करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत निर्णय घेण्यात आला आहे काय, निर्णयाचे स्वरुप काय आहे व त्यावर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०३-०८-२०१६) :** (१) होय.

(२) महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० मध्ये राज्यातील नागरी/ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्थांच्या नियमनासाठीचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन असून यावर अंतिम निर्णय झालेला नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यातील शेतक-यांनी मान्यता प्राप्त सराफ व्यापाऱ्यांकडे गहाण ठेवलेले सोने-चांदीचे दागिने सोडविण्याच्या निर्णयाबाबत**

**(३३) १७४२५ (२७-०४-२०१६). श्री.ख्वाजा बेग, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.नरेंद्र पाटील, श्री.आनंद ठाकूर :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शेतक-यांनी परवाने प्राप्त सराफ व्यापा-याकडे गहाण ठेवण्यात आलेले सोन्या-चांदीचे दागिने सोडविण्याचा निर्णय शासनाने माहे डिसेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निर्णयानुसार आतापर्यंत किती शेतक-यांचे, किती रक्कमेचे सोन्या-चांदीचे दागिने सोडविण्यात आले आहेत व आणखी किती शेतक-यांचे किती रक्कमेचे दागिने सोडविणे बाकी आहे व त्यास किती कालावधीत अपेक्षित आहे ?

**श्री. सुभाष देशमुख (२९-०७-२०१६) :** (१) होय.

विदर्भ व मराठवाड्यातील शेतकऱ्यांनी परवानाधारक सावकारांकडून घेतलेल्या कर्जास माफी देण्याबाबतचा निर्णय शासनाने दिनांक १० एप्रिल, २०१५ रोजी घेतलेला आहे.

(२) सदर निर्णयानुसार विदर्भ व मराठवाड्यातील १९ जिल्ह्यातील ३९,०२७ कर्जदार शेतकऱ्यांची रक्कम रुपये ५५.८७ कोटी किंमतीच्या गहाण वस्तु सावकारांनी परत केलेल्या असून ७,३६६ कर्जदार शेतकऱ्यांची रक्कम रुपये ९.१८ कोटी किंमतीच्या गहाण वस्तु परत करण्याची कार्यवाही सुरु असून त्यासाठी ६ महिन्याचा कालावधी अपेक्षित आहे.

---

**अमरावती विभागासाठी तापी खोऱ्यातील अतिरिक्त पाणी मागणीचा प्रस्ताव**

**(३४) १८३६६ (०४-०५-२०१६). प्रा.जोगेन्द्र कवाडे :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती विभागात सरासरीपेक्षा कमी पाणी उपलब्ध असल्याने तापी खोऱ्यातील अतिरिक्त पाणी मागणीचा प्रस्ताव तयार करण्याविषयी मा.राज्यपालांनी दिलेल्या निर्देशांकडे शासनाने दुर्लक्ष केले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तापी खोऱ्यात ३३ टीएमसी पाणी उपलब्ध असूनही तापी खोऱ्यातील पाण्यापासून पश्चिम विदर्भ वंचित राहत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अमरावती विभागात सिंचन क्षमता वाढवण्यासाठी या प्रकल्पांना प्रशासकीय मान्यता देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (१२-०७-२०१६) :** (१) नाही. मा. राज्यपालांच्या निर्देशानुसार अतिरिक्त पाणी मागणी केंद्रीय जल आयोगाकडे करण्यात आली आहे. तथापि तापी खोऱ्यात अतिरिक्त पाणी उपलब्ध झाले तरी भौगोलिक परिस्थिती पाहता ते अमरावती विभागामधील पूर्णा-तापी उपखोऱ्यात वापरणे शक्य नाही.

(२) अय्यंगार समितीच्या अहवालाप्रमाणे तापी खो-यामधून विदर्भाचा हिस्सा म्हणून ६७.०३ टीएमसी (१८९७.२४७ दलघमी) तसेच शासन पत्र दिनांक १७/११/२०१४ अन्वये मंजूर पश्चिम विदर्भातील जिगांव मोठया प्रकल्पाची विश्वासार्हता कमी करुन उपलब्ध झालेले २५.०९ टीएमसी (७१०.५१ दलघमी) टीएमसी पाणी असे एकूण ९२.०८ टीएमसी (२६०७.७५७ दलघमी) पाणी विदर्भासाठी वापरण्यास शासनाने मान्यता दिली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील ९० हजार सहकारी संस्थांचे अस्तित्व धोक्यात आल्याबाबत**

**(३५) १८५६० (२७-०४-२०१६). श्री.जयवंतराव जाधव :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाने दिनांक १५ जून, २०१५ रोजी सहकारी संस्थांची झाडाझडती घेण्याचा निर्णय घेतल्यामुळे राज्यातील ९० हजार सहकारी संस्थांचे अस्तित्व धोक्यात आल्याचे माहे फेब्रुवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अवसायकांच्या ताब्यात दिलेल्या संस्थांना लेखापरीक्षणासाठी मुदतवाढ देण्याची सहकारी संस्था व हौसिंग सोसायटी बचाव समित्यांची मागणी आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर संस्थांना मुदत देऊन त्या पुन्हा सभासदांच्या ताब्यात देण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (१९-०८-२०१६) :** (१) हे खरे नाही.

(२) होय.

(३) ज्या सहकारी संस्था दिलेल्या पत्त्यावर अस्तित्वात नाहीत किंवा बंद वा कार्यस्थगीत असल्याचे सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १०२ अन्वये अवसायकाचे अंतरिम आदेश काढले आहेत.

सहकारी गृह निर्माण संस्थांच्या संदर्भात दिनांक ३० मार्च, २०१६ रोजी परिपत्रक निर्गमित केले आहे. त्या अन्वये सहकारी गृहनिर्माण संस्थांनी संबंधित निबंधकांनी निश्चित केलेल्या कालावधीत त्रुटीची पुर्तता केल्यास त्या त्या गृहनिर्माण संस्थांचे अवसायकांचे अंतरिम आदेश मागे घेण्यात येतील. कार्यवाहीस विलंब झालेला नाही.

---

**महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळावर (एमपीसीबी) कायद्यानुसार आवश्यक असलेल्या पुर्ण सदस्यांची नियुक्ती न झाल्याबाबत**

**(३६) १८५८५ (२९-०४-२०१६). डॉ.अपूर्व हिरे : दिनांक १५ डिसेंबर, २०१५ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक २ मधील प्रश्न क्रमांक १०४६५ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळावर (एसपीसीबी) कायद्यानुसार आवश्यक असलेल्या पुर्ण सदस्यांचे नियुक्ती प्रक्रियेंतर्गत, राज्यामध्ये काम करीत असलेल्या स्थानिक प्राधिकरणाचे ५ अशासकीय सदस्य व कृषि, उद्योग आणि व्यापार तसेच अन्य हित संबंधाचे प्रतिनिधीत्व करणारे ३ अशासकीय सदस्यांचे नेमणुकीबाबत शासनस्तरावर सुरु असलेली कार्यवाही पुर्ण झाली आहे काय;

(२) असल्यास, राज्यात पर्यावरणाचा खालावत असलेला स्तर पर्जन्यावर तसेच शालेय विद्यार्थीपासून सामान्य जनतेच्या आरोग्यावर होणारा प्रतिकुल परिणाम पाहता, पर्यावरण नियमांची कठोर अंमलबजावणी होणेचे अनुषंगाने पुर्ण सदस्यांची नियुक्ती व अन्य उपाय करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत तसेच सदरहु कार्यवाही केव्हापर्यंत पूर्ण होणे अपेक्षित आहे ?

**श्री. रामदास कदम (१९-०८-२०१६) :** (१) नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळावर कायद्यानुसार आवश्यक असलेल्या सदस्यांच्या नियुक्तीबाबतचा प्रस्ताव शासन स्तरावर विचाराधीन आहे. शासनाची मान्यता प्राप्त होताच सदर नियुक्त्या करण्यात येतील.

---

**राज्यातील ग्रामीण व आदिवासी भागात राष्ट्रीय व उच्च शिक्षण अभियान (RUSA) ही योजना राबविण्याबाबत**

**(३७) १८५८९ (२९-०४-२०१६). डॉ.अपूर्व हिरे : दिनांक २० एप्रिल, २०१५ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक मधील प्रश्न क्रमांक २८२७ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ग्रामीण व १०० टक्के आदिवासी भागातील किमान २५ टक्के विद्यार्थी उच्च शिक्षणाकडे वळले पाहिजे, असे उद्दिष्ट ठेवून उच्च शिक्षणाचा आवाका वाढविण्यासाठी राबविण्यांत येत असलेल्या "राष्ट्रीय उच्च शिक्षण अभियान" (RUSA) या योजनेच्या निकषाप्रमाणे प्रकल्प आखण्याची सुरु असलेली कार्यवाही पुर्ण झाली आहे काय,

(२) असल्यास, निकषाप्रमाणे राज्य शासनाकडून किती महाविद्यालयांचे प्रस्ताव केंद्र शासनाकडे मान्यतेसाठी पाठविण्यात आलेले आहेत त्यापैकी किती प्रस्तावांना मान्यता व अनुदान मंजुर झालेले आहे,

(३) अद्याप योजनेच्या निकषाप्रमाणे प्रकल्प आखण्याची कार्यवाही पुर्ण झालेली नसल्यास ती केव्हापर्यंत पूर्ण होणे अपेक्षित आहे ?

**श्री. विनोद तावडे (२४-०८-२०१६) :** (१) होय.

(२) व (३) सदर योजनेंतर्गत १) महाविद्यालयांचे समूह विद्यापीठांमध्ये रुपांतर करणे.

२) विद्यापीठांना भौतिक सोयी-सुविधा पुरविणे.

३) महाविद्यालयांना सोयी-सुविधा या घटकाखाली ११ प्रस्तावांपैकी ५ प्रस्ताव.

४) शिक्षक संवर्गाची गुणवत्ता व कौशल्य वाढीसाठीचा १ प्रस्ताव.

५) नवोपक्रम व गुणवत्ता विषयक सुधारणा या घटकांतर्गत सादर केलेले ७ प्रस्ताव मंजूर करण्यात आले असून त्यासाठी रुपये २७१ कोटी अनुदान मंजूर करण्यात आले आहे.

---

### पुणे विद्यापीठाचे विभाजन होवून नाशिक येथे स्वतंत्र विद्यापीठ स्थापन करणेबाबत

**(३८) १८५९१ (२९-०४-२०१६). डॉ.अपूर्व हिरे : तारांकित प्रश्न क्रमांक ११८९८ ला दिनांक ७ डिसेंबर, २०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील विद्यापीठांचे विभाजन करण्यासंदर्भात डॉ.राम ताकवले यांचे अध्यक्षतेखाली नेमलेल्या समितीच्या शासनास प्राप्त झालेल्या अहवालावर शासनाने निर्णय घेतला आहे काय,

(२) असल्यास, निर्णयाचे सर्वसाधारण स्वरुप काय आहे व मुंबईसह कोण-कोणत्या विद्यापीठांचे विकेंद्रीकरण करण्याचे शासनाने ठरवले आहे आणि त्यानुषंगाने पुढे कोणती कार्यवाही करण्यांत आली वा येत आहे,

(३) सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठांतर्गत असलेली महाविद्यालयांची ८०० पेक्षा अधिक असलेली संख्या विचारात घेता, पुणे विद्यापीठाचे विभाजन करून नाशिक येथे स्वतंत्र विद्यापीठ स्थापन करणेबाबत शासनाचे धोरण व भुमिका काय आहे,

(४) अद्यापी, उक्त अहवालावर निर्णय घेण्यात आला नसल्यास ही कार्यवाही केव्हापर्यंत होणे अपेक्षित आहे ?

**श्री. विनोद तावडे (०१-०९-२०१६) :** (१) व (२) ज्या विद्यापीठांमध्ये संलग्नीत महाविद्यालयांची संख्या ५०० पेक्षा अधिक आहे. त्यांचे विभाजन करुन राज्यात नवीन विद्यापीठे स्थापन करावी किंवा पदवी स्तरावरील विद्यार्थ्यांच्या परीक्षा घेण्यासाठी एक स्वतंत्र मंडळ स्थापन करावे व पदव्युत्तर आणि संशोधनाचे कार्य विद्यापीठाकडे ठेवावे याबाबत शासनास सल्ला देण्यासाठी डॉ.राम ताकवले यांच्या अध्यक्षतेखाली घटीत केलेल्या समितीने अहवाल शासनास सादर केला आहे. सदर समितीने सादर केलेल्या अहवालामध्ये उपकेंद्राकरिता निश्चित करावयाची पदे तसेच उपकेंद्राकरिता येणारा एकूण खर्च या बाबी अधिक स्पष्ट करण्याकरिता डॉ.योगानंद काळे यांच्या अध्यक्षतेखाली शासन निर्णय दिनांक २८/४/२०१५ अन्वये समितीची स्थापना करण्यात आली आहे. डॉ.काळे समितीने त्यांचा अहवाल शासनास दिनांक २३/०२/२०१६ रोजी सादर केला असून शासन स्तरावर विचाराधीन आहे.

(३) पुणे विद्यापीठाचे नाशिक येथे उपपरिसर केंद्र निर्माण करण्याबाबतचा प्रस्ताव विचाराधीन आहे. नाशिक येथे स्वतंत्र विद्यापीठ स्थापन करण्याबाबत कोणताही निर्णय झालेला वा विचाराधीन नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नागपूर येथील विधीमंडळ अधिवेशन कालावधीत शासकिय कार्यालयात शुध्द पाण्याकरिता लावलेली यंत्रे बंद असल्याबाबत**

**(३९) १८६५८ (२७-०४-२०१६). प्रा.अनिल सोले, श्री.नागो गाणार :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर येथील विधीमंडळ अधिवेशन कालावधीत शासकिय कार्यालयात शुध्द पाण्याकरिता यंत्रे लावण्यात आली होती, हे खरे काय, असल्यास किती यंत्रे लावण्यात आली व त्यावर किती रक्कम खर्च करण्यात आली,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शुध्द पाणी यंत्रे बंद असल्याची तक्रार करण्यात आली होती काय, त्यावर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१९-०८-२०१६) :** (१) हे खरे आहे.
(२) अधिवेशन कालावधीत महत्त्वाचे शासकीय कार्यालयामध्ये शुध्द पाण्याकरिता एकूण ६० यंत्रे लावण्यात आलेली असून त्यावर रुपये १२,२३,४००/- इतकी रक्कम खर्च करण्यात आली आहे. उक्त शुध्द पाण्याची यंत्रे सुस्थितीत असून कार्यान्वित आहेत. उक्त प्रकरणी शुध्द पाणी यंत्रे बंद असल्याची तक्रार प्राप्त झालेली नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजे भटसावंगी तांडा (ता.जि.हिंगोली) येथील स्मशानभूमी मधील अतिक्रमण हटविणेबाबत**

**(४०) १८७२२ (२७-०४-२०१६). श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे भटसावंगी तांडा (ता.जि.हिंगोली) येथील स्मशानभूमीमध्ये अतिक्रमण करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत स्थानिक ग्रामस्थांनी तहसीलदार यांच्याकडे तक्रार दाखल करूनही अतिक्रमण हटविले जात नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, स्मशानभूमीकडे जाण्याचा मार्ग बंद झाल्याने अतिक्रमण करणाऱ्यांविरुद्ध कारवाई करण्याबाबत तसेच सदरहू अतिक्रमण हटविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१९-०८-२०१६) :** (१) मौ.भटसावंगी तांडा, ता.जि.हिंगोली येथील स्मशानभूमीमध्ये अतिक्रमण केल्याची बाब निदर्शनास आली नाही.
(२), (३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**देवघर (ता.अलिबाग, जि.रायगड) जमातुक मुस्लिम समाजासाठी दफनभूमीची जागा मिळणेबाबत**

**(४१) १८७२५ (२७-०४-२०१६). श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे देवघर (ता.अलिबाग, जि.रायगड) येथील स.नं. ४६७ येथील जागेवर जमातुक मुस्लिम समाजाची दफनभूमी पूर्वापार पासून अस्तित्वात आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर जागेची वन विभागामार्फत मोजणी करून दफनभूमीची जागा महसूल विभागाकडून वन विभागाकडे वर्ग करणार आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, अस्तित्वात असलेली दफनभूमीची जागा वगळून इतर क्षेत्र वन विभागाकडे वर्ग करण्यात येणार आहे काय ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२९-०८-२०१६) :** (१), (२) व (३) मौजे देवघर, ता.अलिबाग येथील ग.नं.४६७ (क्षेत्र ४३-७३.६० हे.-आर.) ही शासकीय गुरचरण जमीन असून सदर जमिनीमध्ये मुस्लिम लोक दफन विधी करतात. परंतु सदर जमीन शासनाने जमातुक मुस्लिम समाजास दफनविधीसाठी वाटप केलेली नाही. सदर गुरचरण जागेपैकी ३१-४१.३५ हे. आर. इतके क्षेत्र नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या प्रकल्पासाठी आवश्यक वन जमिनीच्या बदल्यात पर्यायी वनीकरणासाठी वन विभागाकडे वर्ग करण्यात आले आहे. उर्वरित जमिनीपैकी ३ हे. आर जमीन दफनभूमीसाठी मिळण्याबाबत जमातुक मुस्लिम समाजाने मागणी केली असून त्याबाबत शासनाच्या प्रचलित धोरणानुसार उचित निर्णय घेण्यात येईल.

---

**गोळेगाव (जि.औरंगाबाद) येथील पशुवैद्‌यकीय दवाखान्याची इमारत दुरूस्त करण्याबाबत तसेच पशुवैद्‌यकीय अधिकाऱ्यांची नियुक्त करण्याबाबत**

**(४२) १८८२७ (२७-०४-२०१६). श्री.सुभाष झांबड, श्री.संजय दत्त :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद जिल्ह्यातील गोळेगाव येथील पशुवैद्‌यकीय दवाखान्याची इमारत मोडकळीस आली असून सुमारे एक वर्षापासून पशुवैद्‌यकीय अधिकारी नसल्याने येथील गोपालकांची गैरसोय होत असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर दवाखान्याची इमारत दुरुस्त करुन येथे कायमस्वरुपी वैद्यकीय अधिकारी नियुक्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. महादेव जानकर (२९-०७-२०१६) :** (१) हे खरे नाही,

सदर दवाखान्यातील पशुधन पर्यवेक्षकाचे पद रिक्त आहे. त्यामुळे लगतच्या पशुवैद्यकीय दवाखाना, शिवना येथील पशुधन पर्यवेक्षकाकडे अतिरिक्त कार्यभार सोपवून गोळेगाव येथील व कार्यक्षेत्रातील गोपालकांच्या पशुधनास पशुवैद्यकीय सेवा पुरविण्यात येत आहेत.

(२) सदर दवाखान्याची इमारत दुरुस्ती सन २०१६-१७ मध्ये स्वेच्छानिधी अंतर्गत करण्यात येईल.

पशुसंवर्धन विभागात रिक्त पदे भरण्याची प्रक्रिया सुरु असून पशुवैद्यकीय दवाखाना श्रेणी-२ गोळेगाव, जि. औरंगाबाद येथील पशुधन पर्यवेक्षकाचे रिक्त पद भरण्यात येईल.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## गोवर्धन (ता.रिसोड, जि.वाशिम) येथे अनुसूचित जातीकरिता मंजूर झालेल्या घरकुलाकरिता वाढीव गावठाण जमीन मंजूर करण्याबाबत

**(४३) १८८८० (२७-०४-२०१६). श्री.हरिसिंग राठोड, श्री.संजय दत्त :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रिसोड (जि.वाशिम) तालुक्यातील गोवर्धन येथे अनुसूचित जातीकरिता मंजूर झालेल्या घरकुलाकरिता वाढीव गावठाण जमीन मंजूर करुन जागा उपलब्ध करुन द्यावी अशी मागणी मानवी हक्क अभियान या संघटनेने जिल्हाधिकारी वाशिम यांना निवेदन दिले असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त निवेदनावर निर्णय घेऊन मागासवर्गीयांना असणाऱ्या घरकुलासाठी जागा उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२७-०५-२०१६) :** (१) होय.

(२) वाशिम जिल्ह्यातील रिसोड तालुक्यातील सचिव/सरपंच, ग्रामपंचायत गोवर्धन यांनी घरकुल बांधकामाकरिता जागा उपलब्ध करुन देण्याबाबत केलेल्या अर्जानुसार तहसिलदार रिसोड यांच्या कार्यालयाकडून मागणी केलेली जागा मोजणीकरिता उप अधिक्षक, भूमि अभिलेख, रिसोड यांना कळविण्यात आले आहे. या प्रकरणी आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करुन घेण्याची कार्यवाही सुरु आहे. कागदपत्रांची पूर्तता झाल्यानंतर नियमानुसार जागा मंजूर करण्याबाबतची कार्यवाही करण्यात येईल.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबईतील महत्वाकांक्षी कोस्टल रोड प्रकल्पाबाबत**

**(४४) १९५८१ (०२-०७-२०१६). ॲड.अनिल परब, श्री.हेमंत टकले, श्री.रामराव वडकुते, श्री.किरण पावसकर, श्री.नरेंद्र पाटील, श्री.आनंद ठाकूर, श्री.ख्वाजा बेग : तारांकित प्रश्न क्रमांक १४७५९ ला दिनांक २३ मार्च, २०१६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई पश्चिम उपनगरातील वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी कोस्टल रोडचा महत्वाकांक्षी प्रकल्प मुंबई महापालिका उभारत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकल्पातील वांद्रे व कांदिवली या दुस-या टप्प्याचे बांधकाम करण्याची तयारी राज्य रस्ते विकास महामंडळाने महापालिकेकडे व्यक्त केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१४-०७-२०१६) :** (१) होय.

(२) होय.

(३) व (४) याबाबत महानगरपालिकेने प्रथमत: निर्णय घेणे आवश्यक आहे. सद्य:स्थितीत शासनाने निर्णय घेणेची बाब उद्भवत नाही.

---

**सर्व शिक्षा अभियानासाठी उपलब्ध करुन दिलेल्या निधीतील अखर्चित राहिल्याबाबत**

**(४५) १९६३८ (२३-०८-२०१६). ॲड.निरंजन डावखरे, श्री. नारायण राणे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात शाळांसाठी लागणाऱ्या वर्गखोल्या, निवासी, वसतिगृहे, इतर सोयी-सुविधा, गणवेश, पुस्तके आदी उपलब्ध करुन देण्याची जबाबदारी सर्व शिक्षा अभियानाद्वारे पार पाडली जाते हे अभियान महाराष्ट्र माध्यमिक शिक्षण परिषदेच्या अंतर्गत चालते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सर्व शिक्षा अभियानासाठी सन २०१५-१६ या शैक्षणिक वर्षासाठी राज्यातील ३४ जिल्ह्यांसाठी केंद्राकडून ९४१ कोटी २५ लाखांची तरतूद करण्यात आली होती, त्यापैकी ७५ टक्के निधी माहे जानेवारी, २०१६ अखेरपर्यंत खर्च झाल्याने उर्वरित २३० कोटीचा निधी अखर्चित राहिला असल्याचे दिनांक २९ एप्रिल, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, केंद्र सरकारने मागील वर्षातील अखर्चित निधीमुळे या वर्षी सन २०१६-१७ मध्ये राज्याला १५ ते २० कोटीपेक्षा कमी निधी उपलब्ध करुन देण्यात आला असल्याचे तसेच राहिलेला निधी केंद्र शासनाकडे परत पाठविण्याबाबत (surrender) राज्य प्रकल्प संचालकांना निदेश दिले असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदरहु निधी अखर्चित राहण्याची कारणे काय, व त्यास जबाबदार कोण आहेत याबाबत चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशी काय आढळून आले,

(५) तसेच सदर निधी अखर्चित राहण्यास जबाबदार असणाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत तसेच राहिलेला निधी रुपये २३० कोटी केंद्र शासनास परत पाठविण्याबाबत (surrender) कोणती कार्यवाही केली आली वा करण्यात येत आहे तसेच सन २०१६-१७ मध्ये प्रत्यक्षात किती निधी प्राप्त झाला आहे ?

**श्री. विनोद तावडे (१९-१०-२०१६) :** (१) सर्व शिक्षा अभियान महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषेदच्या अंतर्गत चालविले जाते.
(२) व (३) हे खरे आहे.
(४) व (५) प्रश्न उदभवत नाही शासनामार्फत रु. ६०३.६९ कोटी इतका निधी प्राप्त झाला आहे.

---

**मुंबईतील बोरीवली येथील खटाव मिलची जागा शासनाने एमएमआरडीएच्या ताब्यात दिल्याबाबत**

**(४६) ३९०९८ (१६-०५-२०१३). श्री.हेमंत टकले, श्री.विक्रम काळे, श्री.जयवंतराव जाधव, श्री. किरण पावसकर, श्री.नरेंद्र पाटील :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील बोरीवली येथील खटाव मिलची जागा शासनाने एमएमआरडीएच्या ताब्यात नुकतीच दिली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या जागेवर कोणता प्रकल्प राबविण्यात येणार आहे,
(३) या प्रकल्पाच्या कामास केव्हा सुरुवात करण्यांत येणार आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१०-०८-२०१६) :** (१) होय.
(२) सदर जमीन प्राधिकरणाच्या भाडेतत्वावर घरे बांधणे या प्रकल्पासाठी प्राधिकरणास हस्तांतर झालेली आहे.
(३) प्रस्तुत प्रकरणी न्यायप्रविष्ट असल्याने कामास सुरुवात झालेली नाही.

---

**पिंपरी-चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील उद्योग बंद पडून उद्योगाच्या जागेवर निवासी गृह प्रकल्प उभारण्यात येत असल्याबाबत**

**(४७) ४३२०३ (३०-०८-२०१३). ॲड. जयदेव गायकवाड :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पिंपरी-चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील उद्योग बंद पडून उद्योगाच्या जागेवर निवासी गृह प्रकल्प उभारण्यात येत आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले, तदनुसार कंपन्या बंद पडून कामगार बेरोजगार होऊ नयेत म्हणून शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२६-०७-२०१६) :** (१) होय, आतापर्यंत पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेमार्फत एकूण ४६ प्रकरणी औद्योगिक विभागाचे निवासी विभागात रुपांतर केलेले आहे. त्यापैकी बहुतांशी जमिनीवर कोणतेही उद्योगधंदे नसून सदर जागा पूर्णत: मोकळया होत्या यापैकी फक्त ४ ठिकाणी उद्योगधंदे सुरु असलेल्या जमिनीचे क्षेत्रफळ ०.२३६ चौ.कि.मी. आहे. एकूण औद्योगिक क्षेत्रफळाचा विचार करता सदरचे क्षेत्र एकूण औद्योगिक क्षेत्राच्या २% आहे.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पुणे शहरात पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करणेबाबत

**(४८) ४५६८५ (२०-०१-२०१४). ॲड. जयदेव गायकवाड :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे शहराच्या वाढत्या विस्ताराच्या प्रमाणात पुण्याच्या सर्व भागात पिण्याच्या पाण्याचा पुरवठा गत तीन वर्षापासून योग्य प्रमाणात होत नाही, काही भागात एकवेळच पाणी मिळते तर काही भागात दोनवेळा पाणी मिळते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्याची कारणे काय आहेत,

(३) तसेच पुणे शहराच्या वाढत्या विस्तारीकरणाच्या प्रमाणात नागरीकांना पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२६-०९-२०१६) :** (१) हे अंशत: खरे आहे.

(२) पुणे शहरांची भौगोलिक रचनेमुळे सर्व ठिकाणी समान पाणीपुरवठा करणे खालील कारणांमुळे अडचणीचे होते.

१) पुणे शहराच्या उंच भागामध्ये पाणी साठवण क्षमता कमी असल्याने एकवेळस पाणी पुरवठा करण्यात येतो. सखल भागामध्ये गुरुत्वनलिकेद्वारे सध्या सर्व ठिकाणी एक वेळ, एक दिवस आड पाणीपुरवठा करण्यात येत आहे,

२) पुणे शहराच्या गावठाण भागामध्ये जलवितरण व्यवस्था पुर्णपणे सक्षम असल्याने येथे देखील दोन वेळेस पाणीपुरवठा करण्यात येतो.

३) तसेच सन १९९७ पासून पुणे शहराच्या हद्दीमध्ये २३ गावांचा नव्याने समावेश झालेला असल्याने सदरील गावांचा देखील पाणीपुरवठा करण्याची जबाबदारी पुणे महानगरपालिकेवर आहे.

४) पुणे शहराच्या आजू बाजूस ५ कि.मी. अंतराचे आत गावांना देखील पुणे महानगरपालिकेमार्फत काही प्रमाणात पाणीपुरवठा करण्यात येतो.

(३) लोकसंख्येसाठी आवश्यक पाणीपुरवठा योजना तयार करण्यात आली असून, पुणे शहरात समान पाणी वाटप करण्याच्या दृष्टीने आवश्यक वितरण व्यवस्था, दाबनलिका व १०३ पाण्याच्या टाक्या बांधण्याचे नियसोजन आहे. रुपये २८१८ कोटीच्या योजनेस पुणे महानगरपालिकेची मान्यता झालेली आहे. त्यापैकी ८२ पाण्याच्या टाक्यांची निविदा मागविण्यात आलेली असून, सदरचे काम लवकरच सुरु करण्यात येणार आहे. तसेच उर्वरीत कामासाठी कर्जरुपाने निधी उभारण्यासाठी मुख्य सभा ठराव क्र. ९९, दिनांक ८.६.२०१६ अन्वये मान्यता मिळालेली असून, यासाठी कर्ज उभारण्याची प्रक्रिया सुरु आहे.
(४) प्रश्न उदभवत नाही.

---

**अमरावती-औरंगाबाद एक्सप्रेस हायवे दुरूस्ती करण्याबाबत**

**(४९) ४६५३४ (२०-०१-२०१४). श्री.मितेश भांगडिया :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात शैक्षणिक संस्था किंवा कुठल्याही सेवाभावी संस्थांना मालमत्ता कर व विद्युत बील हे कमर्शियल दराने आकारले जाते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सेवाभावी संस्था किंवा शैक्षणिक संस्था समाजामध्ये शिक्षण वा इतर उपक्रमाद्वारे प्रबोधनाचे काम करतात अशा संस्थांना मालमत्ता कर व वीज बील आकारताना घरगुती वापराच्या दराने आकारण्यासंदर्भात शासनाने काय निर्णय घेतला आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०२-०९-२०१६) :** (१) हे अंशतः खरे आहे.

- बृहन्मुंबई, नवी मुंबई, पुणे, औरंगाबाद, चंद्रपूर व इतर महानगरपालिका व नगरपालिका क्षेत्रातील मराठी शाळांना निवासी दराने मालमत्ता कराची आकारणी करण्यात येते.
- नागपूर महानगरपालिका क्षेत्रातील धर्मदाय/शासकीय अनुदानित शाळांना निवासी दराने व इतर सर्व शाळांना मालमत्ता कर निवासी दराच्या दुप्पट दराने आकारण्यात येतो.
- सोलापूर महानगरपालिका क्षेत्रात कमर्शियल दराने मालमत्ता कर आकारण्यात येतो
- पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील मराठी शाळांना बिगर निवासी दरापेक्षा अर्धा दराने मालमत्ता कराची आकारणी करण्यात येते.
- उक्त वस्तूस्थिती पाहता नगरपालिका व महानगरपालिका शैक्षणिक व सेवाभावी संस्थाकडून वेगवेगळया दराने मालमत्ता कर आकारत असल्याचे आढळून येते.
- महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोगाच्या दिनांक २६.०६.२०१५ च्या सुधारणानुसार लघुदाब व उच्चदाब वर्गवारी करुन त्यामध्ये (१) सार्वजनिक सेवा-शासकीय संस्था व इस्पितळे (२) सार्वजनिक-सेवा इतर असे दोन उपवर्गवारी करुन त्यासाठी विजशुल्काचे दर निश्चित केलेले असून त्याप्रमाणे आकारणी केली जाते.

(२) राज्यातील नगरपरिषदा व महानगरपालिका या स्वायत्त स्थानिक स्वराज्य संस्था असून मालमत्ता कर हा त्यांच्या उत्पन्नाचा महत्वाचा स्त्रोत आहे. मालमत्ता कराची आकारणी त्यांना लागू असलेल्या अधिनियमान्वये विहीत अधिकारानुसार केली जाते.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## अमरावती-औरंगाबाद एक्सप्रेस हायवे दुरूस्ती करण्याबाबत

**(५०) ४६६६७ (२७-०१-२०१४). श्री.गोपीकिशन बाजोरिया :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला, बुलडाणा, वाशिम जिल्हयातील नगरपरिषदेच्या विभाग आराखडयासंदर्भात आजतागायत कोणतीच कार्यवाही करण्यात आलेली नाही, हे खरे आहे काय,

(२) शासनाच्या प्रचलित नियमानुसार १० वर्षामध्ये नवीन आराखडा तयार करणे गरजेचे असताना आता सदर मुदत ही २० वर्षाची केलेली असतानाही अद्याप विकास आराखडा तयार करण्यात आलेला नाही, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त विकास आराखडा तयार करण्यास विलंब लागत असल्यामुळे विकास नियमावलीचे उल्लंघन करुन मोठया प्रमाणात अनधिकृत बांधकाम होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,

(५) तद्नुसार उक्त विकास आराखडा तात्काळ तयार करुन त्यावर अंमलबजावणी करण्याबाबत शासन स्तरावर कोणती कार्यवाही करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१७-०७-२०१६) :** (१) नाही.

(२) महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ च्या कलम ३८ च्या तरतूदीनुसार २० वर्षातून किमान एकदा विकास योजना सुधारित करणे अपेक्षित असून विकास योजना अंमलात आल्याच्या दिनांकापासून २० वर्षे पूर्ण होण्यापूर्वी तीन वर्षे अगोदर विकास योजना सुरु करण्याची प्रक्रिया सुरु करण्यांत यावी असे निदेश महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ च्या कलम १५४ अन्वये सर्व नियोजन प्राधिकरणे/सर्व विशेष नियोजन प्राधिकरणे याना शासन निर्णय, दिनांक २/२/२०१२ अन्वये देण्यांत आलेले आहेत.

(३), (४) व (५) अनधिकृत बांधकामाविरुध्द कारवाई करण्याची जबाबदारी संबंधित नियोजन प्राधिकरणाची असून महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ च्या तरतूदीनुसार प्रचलित पध्दतीचा अवलंब करुन विकास आराखडा तयार करण्यासंबंधीचे निदेश शासनाने यापूर्वीच दिनांक २/२/२०१२ दिलेले आहेत.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :** **उत्तमसिंग चव्हाण**
**नागपूर.** **सचिव,**
**महाराष्ट्र विधानपरिषद**

मुद्रणपूर्व सर्व प्रकिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर.